TARUN BHARAT (Marathi) Page No. 05 Date: 08 -03-2020

# तरुणांनी स्वप्ने साकार करण्यासाठी परिश्रम घ्यावे

## अभिनेत्री ॲस्टर नोरोन्हा यांचे उद्‌गार : कोकणी सिनेमावर परिसंवाद

**प्रतिनिधी**
मडगाव

आजचे युग हे स्पर्धात्मक आहे. या स्पर्धात्मक युगात तरुणांनी स्वप्ने पहावीत आणि ही स्वप्ने अस्तित्वात येण्यासाठी प्रखर परिश्रम घेतले पाहिजेत. तरच तुम्हाला यशाची किल्ली सापडेल, असे विचार प्रसिद्ध तेलगू, कन्नड व कोकणी सिनेअभिनेत्री व गायिक ॲस्टर नोरोन्हा यांनी सी. ई. एस. महाविद्यालय कुंकळ्ळी आयोजित 'कोंकणी सिनेमा : तंत्र, मंत्र व फुडार' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिसंवादाच्या समारोप सोहळ्याला प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना व्यक्त केले.



मडगाव : सी. ई. एस. महाविद्यालयात झालेल्या 'कोकणी सिनेमा : तंत्र, मंत्र व फुडार' राष्ट्रीय परिसंवादात सहभागी विद्यार्थिनीला प्रशस्तीपत्र प्रदान करताना अभिनेत्री ॲस्टर नोरोन्हा. मध्यभागी नित्यानंद नाईक.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सावंत देसाई, संयोजक नित्यानंद नायक, उपप्राचार्य डॉ. सरला कटेगरी व अश्विनी च्यारी उपस्थित होते. या राष्ट्रीय परिसंवादाचे उद्‌घाटन प्रसिद्ध तियात्रिस्ट व अभिनेते जॉन डिसिल्वा यांच्या हस्ते झाले.

तद्‌नंतर 'सिने क्षेत्रात युवकांना उपलब्ध संधी' या विषयावरील चर्चासत्रात निर्मात्या जेनेंट नोरोन्हा, सिनेअभिनेत्री समिक्षा देसाई, नाट्यकलाकार राजदीप नाईक आणि पटकथाकार व गितकार साईश पाणंदीकर यांनी सहभाग घेतला.

सिनेमाच्या तांत्रिक विषयावर सिनेमोटोग्राफर दर्शन लोलयेकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समारोप सोहळ्याला प्रा. सोनिया गडकर, बिंदिया गावस व रजत हेगडे यांनी परिसंवादासंबंधी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुण्या ॲस्टर नोरोन्हा यांच्या हस्ते सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. विविध सत्राचे सूत्रसंचालन प्रा. सोनिया गोम्स, प्रा. आश्विनी च्यारी व प्रा. किर्ती गावडे यांनी केले.

या परिसंवादाला १५० हून अधिक विविध महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. मोठ्या संख्येने उपस्थित राहून या परिसंवादाचा आस्वाद घेतल्याने प्राचार्य डॉ. संजय सावंत देसाई यांनी समाधान व्यक्त केले.

तरुण भारत Sun, 08 March 2020
epaper.tarunbharat.com/c/49796480

GOA DOOT (Marathi) Page No. 05 Date: 09 March 2020

# तरुणांनी पाहावीत मोठी स्वप्ने

## ▶ अभिनेत्री ॲस्टर नोरोन्हा; सीईएस महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद

**मडगाव, दि. ८ (प्रतिनिधी)**

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे व म्हणून तरुणांनी भव्य–दिव्य अशी स्वप्ने पहावीत व ती साकार करण्यासाठी कठोर परिश्रम करावेत तरच यशाला गवसणी घालता येईल असे प्रतिपादन सुप्रसिद्ध तेलगू, कन्नड व कोकणी अभिनेत्री ॲस्टर नोरोन्हा यांनी कुंकळ्ळी येथील सीईएस महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय परिसंवादात बोलताना केले.

'कोकणी सिनेमा तंत्र, मंत्र व भवितव्य' या विषयावरील या परिसंवादाच्या समारोप सोहळ्यात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. व्यासपीठावर प्राचार्य संजय सावंत देसाई, संयोजक नित्यानंद नाईक, उपप्राचार्य सरला कटेगिरी व आश्विनी च्यारी उपस्थित होत्या. या परिसंवादाचा प्रारंभ सुप्रसिद्ध तियात्रिस्त व अभिनेते जॉन डिसिल्वा यांच्या हस्ते करण्यात आला होता.



→ *कुंकळ्ळी सीईएस महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमात अभिनेत्री ॲस्टर नोरोन्हा यांचे स्वागत करताना प्रा. संजय सावंत देसाई.*

त्यानंतर चित्रपट क्षेत्रांत युवकांना उपलब्ध संधी या विषयावरील चर्चासत्रांत निर्माती जॅनेट नोरोन्हा, अभिनेत्री नाट्यकलाकार राजदीप नाईक, पटकथाकार व गीतकार साईश पाणंदिकर यांनी भाग घेतला. सिनेमाच्या तांत्रिक बाबीवर दर्शन लोलयेकर यांनी मार्गदर्शन केले. समारोप सोहळ्यात प्रा. सोनिया गडकर, बिंदिया गावस व रजत हेगडे यांनी परिसंवादाबाबत मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांहस्ते सहभागी झालेल्यांना प्रशस्तिपत्रे देण्यात आली. प्रा. सोनिया गोम्स, प्रा. आश्विनी च्यारी, प्रा. कीर्ती गावडे यांनी विविध सत्रांचे संचलन केले. परिसंवादाला विविध महाविद्यालयांतील १५० वर शिक्षक व विद्यार्थी यांनी उपस्थिती लावली.